REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# साहित्य अकादमी :मराठी साहित्य आणि भारतीय भाषा




प्रा. डॉ. पांडुरंग एकनाथ शिवशरण
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, तुळजापुर,
जि. उस्मानाबाद (महा.)

**प्रास्ताविक :**

भारतीय साहित्यामध्ये साहित्य अकादमीचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वांतत्र्य प्राप्त झाले. लोकशाही मूल्यांचा स्वीकार भारतीय समाजव्यवस्थेने केला. अहिंसा, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मूल्यांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. एकूणच भारतीय लोकमानसाच्या मानसिक, बौध्दीक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक, वैज्ञानिक जीवनदृष्टीमध्ये कालपरत्वे अमूलाग्र बदल होत गेल्याचे दिसून येते.

भारतीय साहित्याला प्राचीन परंपरा आहे. इ.स.१२ शतकापासून या परंपरेचा शोध घेता येतो. अशी प्रदिर्घ कालखंडाची पार्श्वभूमी लाभलेले भारतीय साहित्य वेगवेगळया भाषांद्वारे समाजात प्रस्थापित होत आले आहे. वर्तमान स्थितीत होत आहे. कालपरत्वे साहित्याच्या जडण-घडणीत आमुलाग्र बदल होत आलेल्याची नोंदी इतिहासात पहावयास मिळतात. कालखंडानुरुप साहित्य निर्मितीला प्रोत्साहित आणि प्रेरित करणाऱ्या विविध संस्था प्राचीन काळापासून कार्यरत असल्याचे पहावयास मिळते. बदलत्या कालखंडानुरुप आणि राजसत्तेनुरुप साहित्याच्या कक्षा विस्तारत गेल्या आहेत. इंग्रजी राजवटीपासून जीवनाचा आविष्कार परिधान केलेले साहित्य आज उच्चतेच्या सर्वोच्च टोकाला पोहचले आहे. वर्तमान काळात भारतीय भाषातील साहित्याला वृध्दींगत करण्यासाठी अतुलनिय आणि महत्वपूर्ण कार्य करणारी संस्था म्हणून 'साहित्य अकादमी' सर्व परिचित झाली आहे.

दि.१२ मार्च १९५४ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते स्थापन झालेली ही संस्था आज ५० वर्षे पूर्ण करीत आहे. भारतीय साहित्याचा सक्रीय विकास करणारी ही संस्था आज लेखकांच्या जीवनात प्रतिष्ठेची म्हणून गणली जातेय. साहित्याचे मानदंड निश्चित करणे, भारतीय भाषेतील, साहित्यिक देवाणघेवाणीमध्ये समन्वय साधणे आणि या माध्यमातून देशाची सांस्कृतिक एकता व एकात्मता टिकविणे तसेच उत्तमोत्तम साहित्य निर्मितीस चालना देणे या उदात्त उद्दीष्टांना घेऊन प्रस्थापित झालेली ही संस्था आज मोठया नावारुपाला आलेली आहे. साहित्य अकादमीमुळे सांस्कृतिक व भाषिक भिन्नतेतएकता निर्माण करण्यास मोठी मदत झालेली आहे. भारतीय समाजातील वैविध्यपूर्ण भाषांत अनुबंध निर्माण करण्याचे महनीय कार्य साहित्य अकादमीने केले आहे. भारतीय भाषांतील साहित्याला सातासमुद्रापलिकडे नेण्यात साहित्य अकादमीने महत्वाची भूमिका बजावली आहे.

भारतीय सामाजिक जीवन हे विविधतेने नटलेले आहे. भारतीत विविध समाज आपल्या भाषा, संस्कृती, रुढी, परंपराची जोपासना करत जीवन जगत आहेत. या विविध सामाजिक जीवनाला अधोरेखित करणारे त्या त्या समाजाची भाषा अंगिकारुन अविष्कृत होणारे विपूल साहित्य आज निर्माण होत आहे. या वेगवेगळया भाषांमधून निर्माण होणारे सकस व समृध्द वाङ्मय हे प्रत्येकांच्या परिचयाचे असतेच असे नाही. आपआपल्याच भाषेतील साहित्याशी आपण परिचित होतो. ही भाषिक मर्यादा ओलांडून या सकस आणि समृध्द साहित्याशी परिचय घडून आला तो साहित्य अकादमीमुळेच. साहित्य अकादमी अखिल भारतीय स्तरावरील उत्तम साहित्याची निवड करते. यामुळेच भारतीय स्तरावर मराठी साहित्याची व्यापकता, श्रेष्ठता तपासण्यास मदत होते आणि म्हणूनच सर्व भाषांमधील लेखक, वाचक व समीक्षक यांचे अनुभवविश्व समृध्द करणारी एक महत्वपूर्ण साहित्य संस्था म्हणून साहित्य अकादमी मान्यता पावली आहे.

भारतीय राज्यघटनेने २२ भारतीय भाषांना मान्यता दिलेली आहे. या २२ भाषांतून प्रकाशित होणाऱ्या वैविध्यपूर्ण आणि वैशिष्टपूर्ण कालाकृतींना वेगवेगळया निकषांची कसोटी ठेवून साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करते. या स्वायत्त संस्थेमार्फत सर्वोकृष्ट स्वतंत्र तसेच अनुवादित ग्रंथास पुरस्कार दिला जातो. सन १९५५ ते २०१२ पर्यंत पुरस्कारप्राप्त ग्रंथांमध्ये इतिहास, संस्कृती, समीक्षा, चरित्र, आत्मचरित्र, कादंबरी, कथा, कविता, संशोधन, भाषा शास्त्र, लघुनिबंध, लघुकथा, नाटक अशी वैविध्यपूर्णता असल्याचे निदर्शनास येते. अशा वैविध्यपूर्ण साहित्यकृतींच्या निवडीबाबतची पारदर्शकता साहित्य अकादामीचे खास वेगळेपण सिध्द करते. वेगवेगळया साहित्य प्रकारातून वेगवेगळया

विषयांना साकारणाऱ्या या साहित्यकृती त्या त्या काळातील मैलावरचा दगड ठरलेल्या, नवीन प्रवाह निर्माण करणाऱ्या आणि समकालीनात वेगळेपण सिध्द करणाऱ्या आहेत. म्हणूनच त्या वैशिष्टयपूर्ण व पुरस्कारास सार्थ ठरल्या आहेत.

साठोत्तरी वाङ्मय प्रवाहातील दलित, ग्रामीण देशी इ. प्रवाहातील वेगवेगळया साहित्यकृतींना आजवर साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. या पुरस्कार प्राप्त साहित्यकृतींनी मराठी साहित्य विश्वाला समृध्द केले आहे. अशा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त श्रेष्ठ कलाकृतींचा वैचारिक भूमिकेतून विचार करताना साहित्य अकादमीची संकल्पना, स्वरुप व वाङमयीन वृध्दी विचारात घेणे मला महत्वाचे वाटते.

भारतामध्ये भाषापरत्वे राज्याची निर्मीती झाली, त्यामुळे भारतीय भाषा आणि भाषिक साहित्याची जडणघडण कालपरत्वे होत गेलेली आहे. भाषा, समाज, साहित्य आणि संस्कृती यांमध्ये ऋणानुबंध असल्याचे दिसून येते. भारतीय साहित्याच्या जडणघडणीमध्ये "साहित्य अकादमीचे" वाङ्मयीन कार्य अत्यंत महत्वाचे आहे. कारण एकभाषिक असलेल्या साहित्याकृतीला राष्ट्रीय साहित्याचा दर्जा प्राप्त करुन देण्याचे कार्य साहित्य अकादमीमुळे प्राप्तझाल्याचे दिसून येते. त्याविषयी प्रभाकर क्षेत्रिय म्हणतात की, "प्रांतीय भाषाओ को भी राजभाषाओं का दर्जा दिया गया और इसके सन्मर्तन के लिए भाषावार प्रांतो की रचना की गई शिक्षा यद्दापि प्रांतो का विषय था (और है।) परंतु भाषाओं के सामंजस्य के लिए शिक्षा में त्रिभाषा सुत्र पर सहमती बनी। इसके अंतर्गत हर प्रदेश में स्कूली शिक्षा के स्तर पर पहली मातृभाषा, दुसरी राज्यभाषा या राष्ट्रभाषा और तिसरी विदेशी भाषा के पाठयक्रम में शामिल करना था। शिक्षा का माध्यम मातृभाषा स्वीकार की गई ।"

प्रभाकर क्षेत्रिय यांनी भारतीय भाषेचे महत्त्व स्पष्ट करताना राज्यपरत्वे प्रत्येक भाषा ही अत्यंत महत्वाची आहे. मातृभाषा, राष्ट्रीय भाषा आणि विदेशी भाषा सुत्रातून शिक्षण दिले जाते. परंतु मातृभाषेतून शिक्षण मिळाले पाहिजे ही त्यांची वैचारिक भूमिका महत्वाची असल्याचे दिसून येते. प्रादेशिक भाषेतील साहित्यातून त्या त्या भूप्रदेशातील लोकजीवन, त्यांची सामाजिक संस्कृती, राजकीय लोकपरंपरा तसेच त्यांच्या जीवनशैलींच्या वेगवेगळ्या वैशिष्टयांची अभिव्यक्ती साहित्यातून होत असते. त्यामुळे प्रादेशिक लोकजीवनाची समृद्ध परंपरा साहित्यात होत असल्यामुळे साहित्य अकादमीने भारतीय प्रादेशिक साहित्याला राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक ऐक्य भारतीय लोकमनात निर्माण करण्याचे एक अलैकिक कार्य साहित्य अकादमीने केल्याचे दिसून येते. या संदर्भात आपले मत मांडताना प्रा.सुहास निर्मळे साहित्य अकादमीविषयी म्हणतात की, "भारत देश हा समृद्ध, सांस्कृतिक व वाङ्मयीन परंपरा लाभलेला प्रदेश आहे. मुद्रणतंत्र भारतात आले आणि लेखन प्रक्रिया अधिक गतिमान झाली. ब्रिटीश काळात दक्षिण प्राईज कमिटीतर्फे ग्रंथोत्तेजनासाठी ग्रंथ पुरस्कार देण्याची प्रथा सुरु झाली. आज भारत देशात १५ भाषांमध्ये जे लेखन वाङ्मयीनदृष्टया वेगळे आहे. अशा वाङ्मयीन लेखनास, कलाकृतीस भारतीय साहित्य अकादमी विशेष ग्रंथ पुरस्कार देते व कलाकृती निर्मात्या, लेखक, कवींचे कौतुक करुन गौरव करते." प्रा.सुहास निर्मळे यांनी भारतीय संस्कृती व वाङ्मय यांना लाभलेली परंपरा किती जुनी आहे हे सांगून पूर्वीपासूनच ग्रंथनिर्मितीसाठी कसे उत्तेजन दिले जात होते ते स्पष्ट केले आहे आणि याच पार्श्वभूमीवर साहित्य अकादमी आज वर्तमान स्थितीत कसे महत्वपूर्ण कार्य करत आहे तेही सांगितले आहे.

## १. साहित्य अकादमी आणि मराठी साहित्य :

मराठी साहित्यामध्ये कालपरत्वे वेगवेगळे साहित्य प्रकार निर्माण झालेले आहेत. कथा, कांदबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र आणि समीक्षात्मक साहित्याची निर्मीती झालेली आहे. मराठी साहित्यात 'कांदबरी' हा समृद्ध साहित्यप्रकार आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये मराठी कांदबरीची निर्मीती झाली आहे आणि होत ही आहे.

मराठी कांदबरीमध्ये सामाजिक, ऐतिहासिक अद्‌भुतरम्य कांदबरीकारांनी ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, प्रादेशिक कांदबऱ्यांची निर्मीती केल्याचे दिसून येते. मराठी साहित्यिकांनी कथा व कांदबरीतून आशयमुल्यांची मांडणी अतिशय कलात्मकतेने केली आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कथात्मक साहित्याचा शोध संशोधनात्मक पद्धतीने करताना प्रत्येक प्रकरणातून आणि वैचारिक भूमिकेतून करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मराठी साहित्य हे जुनी परंपरा लाभलेले साहित्य आहे. इ.स.च्या १२ व्या शतकापासून मराठी साहित्यात वेगवेगळया वाङ्मय प्रकार आणि प्रवाहात साहित्य लेखन होत आलेले आहे. कधी स्वतंत्र तर कधी अनुवादाच्या स्वरुपात मराठी साहित्यामध्ये कालपरत्वे बदल होत आलेले आहेत. अर्वाचीन काळापासून नाविन्याचा परिपोष धारण केलेले मराठी साहित्य कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, लघुलेखन, ललित निबंध, समीक्षात्मक अशा वेगवेगळया साहित्य प्रकारात विकसित व विस्तारीत होत आलेले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, प्रादेशिक, देशी अशा वेगवेगळया प्रवाहांद्वारे मराठी साहित्याची वृध्दी झाल्याचे निदर्शनास येते.

साहित्याच्या वेगवेगळया प्रकारात कथा आणि कांदबरी या वाङ्मय प्रकारांना विशेष यश आणि लोकप्रियता मिळालेली आहे. मराठी कादंबरी ऐतिहासिक सामाजिक, राजकीय, पौराणिक, अद्‌भूतरम्य ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, प्रादेशिक अशा वेगवेगळया प्रकारातून मोठया प्रमाणावर लिहिली गेली. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाने जनसामान्यांनाही लेखनास प्रवृत्त केल्याने देशाच्या वेगवेगळया भागातून आपआपल्या समाजाचे वास्तवपूर्ण चित्रण रेखाटणारे नवोदित लेखक मोठया प्रमाणात या कालखंडात लिहिताना दिसतात.

मराठी साहित्य लेखनाचा विकास आणि विस्तार करुन त्याला समृध्द बनविण्यात महत्वाचे योगदान देणारे एक महत्वपूर्ण संस्था साहित्य अकादमीच्या रुपाने निर्माण झाली. या साहित्य संस्थेद्वारे उत्कृष्ठ साहित्यकृतींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येऊ लागले. या

साहित्य संस्थेद्वारा देण्यात येणारा पुरस्कार साहित्याच्या लेखनात श्रेष्ठ व उच्चप्रतीचा म्हणून गणला जाऊ लागला. परिणामी, या प्रेरणेने साठोत्तरी कालखंडात अनेकांनी आपल्या लेखन कौशल्याद्वारे साहित्याच्या वेगवेगळया प्रकारात उत्कृष्ठ असे लेखन करुन मराठी वाङ्मयाच्या समृध्दीत मोलाची भर टाकली आहे. साहित्याच्या वेगवेगळया प्रकारातून आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक जीवनाचे भेदक आणि वास्तवपूर्ण चित्रण या लेखकांनी केल्यानेच साहित्य अकादमीच्या निकषास या कलाकृती पात्र ठरलेल्या आहेत.

दि.१२ मार्च १९५४ रोजी स्थापन झालेल्या या संस्थेने आजवर ५०-५५ मराठीतील वेगवेगळया प्रकारातील कालाकृतींना पुरस्कार बहाल केले आहेत. प्रारंभी समीक्षा संशोधनास हे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. यात 'वैदिक संस्कृतीचा इतिहास' (१९५५) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, 'सौंदर्य आणि साहित्य' (१९५६) बा.सी. मर्ढेकर यांची नावे घेता येतात. अलीकडे मात्र या पुरस्काराला ग्रामीण दलित, प्रादेशिक, देशी या सर्वच प्रवाहाने गवसणी घातली आहे. सन १९५५ पासून जवळ जवळ १३ समीक्षा व संशोधन ग्रंथांना हे पुरस्कार मिळाले आहेत. मराठी समीक्षेला समृध्द करणारे हे ग्रंथ सौंदर्यवाद आणि जीवनवाद याची कलात्मकतेने मांडणी करणारे आहेत. या संशोधन ग्रंथांचा विचार करताना द.ग.गोडसे यांच्या 'पोत' सारख्या उत्कृष्ठ संशोधन ग्रंथाला हा पुरस्कार का मिळू नये ? असा प्रश्न निर्माण होतो.

मराठी साहित्याच्या कक्षेत साठोत्तर कालखंडात चरित्र आत्मचरित्रांची रचना मोठया प्रमाणात झालेली आहे. आपल्या चरित्र आत्मचरित्र लेखनातून त्या त्या लेखकांनी समकालीन सामाजिक परिस्थितीचे, संस्कृतीचे जाती-धर्माचे वास्तवपूर्ण व मनोवेधक चित्रण केले आहे. या चरित्र आत्मचरित्रांची निर्मिती करणारे लेखक वेगवेगळया जाती-धर्मातून आलेले असल्याने त्यांच्या लेखक निर्मितीला विशिष्ट परिणाम लाभल्याचे पहावयास मिळते. अशा समृध्द संपन्न असणाऱ्या वेगवेगळया १३ कलाकृतींना आजवर साहित्य अकादमीने गौरविले आहे. यात प्रामुख्याने 'श्री शिवछत्रपती' (चरित्रात्मक) १९६६ त्र्यंबक शंकर शेजवलकर, 'स्मरणगाथा' (आत्मचरित्रात्मक) (१९७६) गो.नि.दांडेकर 'एक झाड आणि दोन पक्षी' (आत्मचरित्रात्मक) विश्राम बेडेकर अशी काही प्रातिनिधिक नावे घेता येतील.

मराठी साहित्यक्षेत्राच्या परिघात विशेष चर्चिला गेलेला आणि लोकप्रिय ठरलेला वाङ्मय प्रकार म्हणून मराठी कादंबरी सर्वपरिचित आहे. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कलाकृतीमध्ये कादंबरी वाङ्मय प्रकार अग्रस्थानी आहे. आजवर जवळ जवळ १५ पेक्षा जास्त कादंबरी लेखनास हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. वेगवेगळया साहित्य प्रवाहातील अनेकविध कादंबऱ्या या पुरस्काराने गौरविल्या गेल्या आहेत. यात प्रामुख्याने 'ययाति' (१९६०) वि.स.खांडेकर, 'रथचक्र' (१९६३) श्री.ना.पेंडसे, 'बारोमास' (२००४) सदानंद देशमुख अशी काही नावे प्रातिनिधिक स्वरुपात घेता येतील. साहित्य अकादमीने त्या त्या काळातील समकालीनात वेगवेगळेपण सिध्द केलेल्या साहित्यकृती निवडून त्यांना पुरस्काराने गौरविले आहे. एकूण कादंबरी लेखनात समृध्दता व उत्कृष्टता आणण्यासाठी अकादमीने अतुलनीय कार्य केले आहे.

मराठी कवितेला नाविन्यपण आणि वेगळेपण निर्माण करुन देणाऱ्या वेगवेगळया कविता संग्रहांनी मराठी काव्याच्या प्रांतात नवीन रचनातंत्र निर्माण केले आहे. परंपरा आणि रुढी रिती रिवाजाला मागे टाकून समकालीन जीवनाचे विविधांगी चित्रण करणारी मराठी कविता काव्याच्या प्रवाहाला अधिकाधिक समृध्द करीत आहे. मराठी कवितेच्या या बदलत्या स्वरुपात मोलाची आणि महत्वपूर्ण भूमिका साहित्य अकादमीने पार पाडली आहे. आजवर साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेल्या काव्य संग्रहात 'दशपदी' (१९७७) कवी अनिल, 'सलाम' (१९८०) मंगेश पाडगावकर, 'भिजकी वही' (२००८) अरुण कोल्हटकर अशी काही नावे प्रातिनिधक स्वरुपात घेता येतील.

साहित्याच्या वेगवेगळया प्रकारात व्यक्तिचित्रणात्मक संग्रहातील पु.ल.देशपांडे यांच्या 'व्यक्ति आणि वल्ली' लेखनकृतीस १९६५ साली पुरस्कार प्राप्त झाला तर लघुनिंबध आणि लघुकथा संग्रहातील पुरस्कार दुर्गा भागवत यांच्या 'पैस' (लघुनिबंध) व जी.ए. कुलकर्णी यांच्या 'काजळमाया' (लघुकथा संग्राहास) प्राप्त झालेले आहेत. मराठीतील नाटय वाङ्मय या पुरस्कारास अगदी त्रोटक स्वरुपात सिध्द झाल्याचे पहावयास मिळते. मराठीत आजवर केवळ दोनच नाटयकृतींना अकादमीचा पुरस्कार मिळालेला आहे. यात शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' (१९७४) व महेश यलकुंचवार यांच्या 'युगान्त' (२००२) या कालाकृतींचा समावेश आहे.

साहित्य अकादमीने तटस्थपणे सर्वोत्कृष्ट कलाकृतींची निवड करुन त्या त्या काळात आपले वेगळेपण सिध्द करणाऱ्या कलाकृती समकालिनात कोणकोणत्या वाङ्मयीन गुणांनी वेगळया ठरल्या आहेत ते निदर्शनास येते. मराठी साहित्याला समकालीन भारतीय साहित्यात महत्वाचे आणि मानाचे स्थान प्राप्त करुन देण्यात साहित्य अकादमीने भरीव कार्य केले आहे आणि म्हणूनच मराठी साहित्याचे समकालीन साहित्यातील योगदान मोठे आहे. मराठी साहित्याच्या वेगळेपणाविषयी आणि श्रेष्ठत्वाविषयी लक्ष्मण गायकवाड यांनी मांडलेले मत विचारात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात,"मराठी साहित्य की यह विशेषता रही है की, ज्ञानेश्वर, तुकाराम से लेकर नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे तक विश्व के साहित्य को छुने की बात करके मराठी बदलाव लाने का प्रयास किया । आज समकालिन भारतीय साहित्य में मराठी साहित्य का बहुत बडा योगदान दिखाई पडता है ।" लक्ष्मण गायकवाड यांनी भारतीय मराठी साहित्य पूर्वपरंपरेपासून आजतागायत बदलाला कसे स्विकारत आले आहे ते सांगून या बदलाला अंगिकारल्यामुळेच भारतीय साहित्य मराठी साहित्याचे मोठे योगदान असल्याचे ते स्पष्ट करतात.

## २. साहित्य अकादमी आणि भाषांतरित साहित्य :

जागतिकिकरणाच्या प्रक्रियेत वर्तमान स्थितत जगातील अनेक भाषा एकमेकींच्या सानिध्यात येत आहेत. संप्रेषणासाठी आज वेगवेगळया भाषा अवगत करुन घेण्यासाठी लोक वेगवेगळया भाषेचे अध्ययन करतात. यातूनच आज 'भाषांतर' या संकल्पनेने मोठे महत्व प्राप्त केलेले आहे. वेगवेगळया भाषेतून आज मोठया प्रमाणात साहित्याची भाषांतरे होत आहेत. या भाषांतर प्रक्रियेला प्रवाही बनविण्यात

वर्तमान स्थितीत साहित्य अकादमीने मोठा हातभार लावला आहे. भाषांतर प्रक्रियेत अनेकांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देऊन भाषांतर विकास आणि विस्तार केला आहे.

भाषेला जसा इतिहास आहे. तसाच भाषांतरालाही इतिहास आहे. 'रोम कालखंडापासून भाषांतर होत आल्याचे" डॉ.अंजली सोमन यांनी भाषांतराची सुरुवात कधी झाली ते नोंदविलेले आहे. बदलत्या काळानुरुप भाषांतराचे स्वरुपही बदलत गेले आहे. "मुळ साहित्यकृतीशी प्रामाणिक राहून त्या मुळ भाषेतील शब्दांचे इतर भाषेत रुपांतर करण्याच्या प्रक्रियेला भाषांतर असे संबोधता येईल. भाषांतर या प्रक्रियेला लेखक, विचारवंत, अभ्यासक आणि समीक्षकांनी वेगवेगळया संज्ञेद्वारे स्पष्ट केले आहे. 'भाषांतर' च्या संकल्पनेला स्पष्ट करताना डॉ.म.आ.करंदीकर म्हणतात, "भाषांतर हा सर्जन व्यवहाराच्या तुलनेत दुय्यम व्यवहार असला तरी मुळतः तो निष्ठेने जबाबदारीने पार पाडण्याचा सांस्कृतिक व्यवहार आहे." तर भाषांतर विषयीची आपली संज्ञा स्पष्ट करताना हिंदी साहित्यिका डॉ.रेखा देशपांडे म्हणतात, "दो संस्कृती का सेतू अनुवाद है । दो दिलोंको जुडनेवाले फोलोनामा अनुवाद है ।" डॉ.करंदीकर यांनी भाषांतर सर्जन व्यवहाराच्या दृष्टीने दुय्यम दर्जाचे असले तरी भाषांतर ही निष्ठेने आणि जबाबदारी पार पाडण्याची प्रक्रिया असल्याने त्यातून सांस्कृतिक आदन-प्रदान कसे होत आहे ते स्पष्ट केले आहे. तर डॉ.रेखा देशपांडे यांनी दोन संस्कृतींना एकत्रित आणणारा सेतू आणि दोन मनात सुसंवाद साधणारा फोलनामा असे भाषांतराचे सार्थ वर्णन केले आहे.

भाषांतर या प्रक्रियेला आता अधिकाधिक महत्व प्राप्त झाले आहे. जागतिकिकरण जसजसे वाढत जाईल तस-तसे जगातील भाषेचे महत्वही वाढत जाईल. या आजच्या काळातील गरज ओळखूनच साहित्य अकादमीने भाषांतर प्रक्रियेला मोठे स्थान निर्माण करुन दिले आहे. भारतात आणि मराठीत भाषांतर प्रक्रियेला वेग आला तो इंग्रजी राजवटीत त्या काळात अनेक इंग्रजी पुस्तके मराठीत अनुवादित झाली या प्रेरणेतूनच आज २१ व्या शतकात साहित्य अकादमीच्या योगदानातून जर्मन, फ्रेंच, रशियन, स्पॅनिश, जॅपनीज तसेच इतरही अनेकविध भाषेतील साहित्याचे मोठया प्रमाणात भाषांतर केले जात आहे. जागतिकीकरणामुळे आजच्या काळात या भाषांना विशेष महत्व प्राप्त झाले आहे. या भाषांतरामुळे पर भाषेशी परिचित झाल्याने अनेकांना जागतिक पातळीवर मोठमोठया नोकऱ्या, व्यावसायिक संधी उपलब्ध झाल्या आहेत. एका अर्थाने हे साहित्य अकादमीचे भारतीयांच्या विकासासाठी मोठे सहकार्यच म्हणावे लागेल.

'भाषांतर' प्रक्रियेला प्रवाही बनविण्यासाठी अकादमीच्या वतीने समकालीनात सर्वोकृष्ट ठरलेल्या भाषांतरीत कलाकृतीला पुरस्कार दिला जातो. त्याचबरोबर भाषांतरकाराला वेगवेगळया सोयीसुविधाही पुरविल्या जातात. अकादमीच्या या भाषांतरीत साहित्य प्रक्रियेमुळे आज वाचनसंस्कृतीही मोठया प्रमाणात विकास पावू लागली आहे. भाषांतराला प्राधान्यक्रम दिल्यामुळेच इतर भाषेतील उत्कृष्ट आणि साहित्य विश्वाला नव्या दिशा प्राप्त करुन देणाऱ्या अभिजात कलाकृती मराठीत आल्या आहेत.

आजच्या आधुनिक काळात मुळ भाषेत साहित्याला जसे महत्व आहे तसेच भाषांतरीत साहित्यालादेखील अनन्यसाधरण महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. जागतिक साहित्यामध्ये आणि भारतीय साहित्यामध्ये भाषांतरीत साहित्यानिर्मीतीस प्रोत्साहान देण्याचे कार्य अनेक संस्था करताना दिसून येतात. भारतीय साहित्यामध्ये 'साहित्य अकादमी' ही संस्थादेखील विविध भाषेतील साहित्यनिर्मीतीला चालना देण्याच्या (सहकार्य करण्याच्या) भुमिकेतून कार्य करत आहे.

भारतीय भाषेतील अभिजात व आशयसंपन्न साहित्यकृतीची भाषांतरे कालपरत्वे साहित्य अकादमीने क्रमशः प्रसिद्ध केलेली आहेत. त्यामुळे २४ भाषेतील साहित्य हे वाचकाभिमुख झाले, तसेच भाषेतील साहित्यकृतीदेखील लोकाभिमुख करण्याचे अतूलनिय कार्य साहित्य तत्वनैतिकतेने व प्रामाणिकपणे करत आहे. भारतीय भाषांना आणि भारतीय साहित्याला सांस्कृतीक, ऐतिहासिक, सामाजिक, वैज्ञानिक तत्वमुल्यांची जाणीव करुन देण्याचे कार्य साहित्य अकादमी मोठया प्रमाणात करत आहे.

भाषांतर म्हणजे काय? भाषातंराचे महत्व? या प्रश्नांचा जेंव्हा आपण विचार करतो तेंव्हा साहित्य अकादमीने भारतीय भाषेतील साहित्याला आणि भाषांतरित साहित्याला महत्व दिल्याचे दिसुन येते. भाषांतरीत साहित्याविषयी डॉ. भोवाळ दयांनद म्हणतात की, "भारत हा बहूभाषिक देश असल्यामुळे भांषातराची प्रक्रिया आधुनिक काळामध्ये अत्यंत विकासाभिमुख प्रवृत्तीने भारतीय भाषेमध्ये निर्माण झालेली आहे." वरील मताचा विचार करता आपल्या लक्षात येते की, भारतीय साहित्यामध्ये वेगवेगळया भाषेतील साहित्याची निर्मीती कालपरत्वे होत गेलेली आहे. साहित्य अकादमीने देखील भारतीय भाषेतील मूळ साहित्याचे भारतीय भाषेमध्ये भाषांतरीत करण्याचे अलौकिक कार्य केल्याचे दिसून येते. भारतीय साहित्याला वाचकाभिमुख, लोकाभिमुख, समाजाभिमुख करण्याचे कार्य साहित्य अकादमी करत आहे. हे साहित्य अकादमीचे कार्य वाचक, अभ्यासकांच्या अत्यंत सोयीचे आणि संशोधन कार्याला प्रेरीत करणारे आहे. भारतीय साहित्याच्या जडणघडणीमध्ये वेगवेगळया भाषेतील साहित्याला जसे महत्व आहे तसेच साहित्य अकादमीच्या प्रेरणेतून लिहिल्या गेलेल्या आणि भाषांतरीत झालेल्या दर्जेदार साहित्य कृतींना महत्व देणे आवश्यक आहे.

### ३. साहित्य अकादमी कार्यकारणी :

साहित्य अकादमीच्या कार्यकारणीत ९७ वेगवेगळे जाणकार प्रतिनिधी कार्यरत असल्याचे दिसून येते. यात अकादमीचे अध्यक्ष, आर्थिक सल्लागार, भारत सरकारच्या वतीने निवडण्यात आलेले ५ प्रतिनिधी, ३५ प्रतिनिधी हे वेगवेगळया प्रांत आणि केंद्रशाषित प्रदेशातील असतात तर २२ प्रतिनिधी हे अकादमीने मान्यता दिलेल्या भाषेचे जाणकार असतात. भारतातील वेगवेगळया विद्यापीठातील २० प्रतिनिधीही

अकादमीच्या कार्यकारणीत कार्यरत असतात. ८ प्रतिनिधी हे उच्चस्थानावर विराजमान असणाऱ्या सल्लगार मंडळातील विद्वान असतात. त्याचबरोबर संगीत, नाटक अकादमी, ललित कला अकादमी, भारतीय सांस्कृतिक मंडळ, प्रकाशक संघटना यापैकी १ असे एकूण ९७ प्रतिनिधी साहित्य अकादमीच्या कार्यकारणीत कार्यरत असल्यामुळे साहित्य अकादमाची तत्वे आणि धोरणे ही अकादमीतील जाणकार मंडळीद्वारे आखली जातात. या मंडळाला सहकार्य करण्यासाठी एक सल्लागार समितीचीही नियुक्ती केलेली असते.

भारत सरकारने साहित्य अकादमी स्थापना केलेली आहे. साहित्य अकादमीची ध्येयधोरणे आहेत ती जनरल कौन्सीलमध्ये तयार केली जातात. भारतीय भाषेतील प्रत्येक भाषेसाठी एक सल्लागार मंडळाची नियुक्ती केली जाते. भारतीय भाषेच्या साहित्याच्या आणि संस्कृतीच्या (विकासासाठी) संवर्धन करण्याचे कार्य करते. साहित्य अकादमीच्या जनरल कौन्सीलचा कार्यकाल (५) पाच वर्षाचा असतो. साहित्य अकादमीच्या अध्यक्षांची, उपाध्याक्ष आणि सदस्यांची निवड ही जनरल कौन्सीलमध्ये केली जाते. म्हणून भारतीय साहित्याला पारदर्शकता, परिपक्वता, आशयसंपन्नता, नैतिक मुल्यांची जाणीव करुन देण्याचे कार्य दिसून येते.

साहित्य अकादमीचे कार्यकारी मंडळ भारतीय भाषेतील साहित्याला नि:पक्षपातीपणे न्याय देण्याचा प्रयत्न करते, हे मला विशेषत्वाने दिसुन येते. या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष, उपाध्याक्ष, सचिव आणि इतर सदस्यांचे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. त्याची कार्यपद्धती आणि कार्यकाळ अभ्यासणे मला महत्वाचे वाटते ते खालील प्रमाणे.

**अध्यक्ष :**

साहित्य अकादमीच्या अध्यक्षपदी राजकीय, सामाजिक विचारवंत आणि साहित्यक्षेत्रातील नामवंत मंडळींची निवड झाल्याचे दिसून येते. या अकादमीचे पहिले अध्यक्ष पंतप्रधान कै.पंडित जवाहरलाल नेहरु यांची निवड १९६३ मध्ये झाली. १९६४ मध्ये देखील त्यांची फेरनिवड करण्यात आली, पण दुर्देवानी त्यांचा अकाली मृत्यू झाला त्यानंतर डॉ. एस. राधाकृष्णन यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यानंतर डॉ. झाकीर हुसेन यांची १९६८ मध्ये, १९६९ मध्ये डॉ. सुनीत कुमार चटर्जी यांची, तसेच १९७३ मध्ये अध्यक्ष म्हणुन पुन्हा त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या मृत्युनंतर मे १९७७ मध्ये प्रोफेसर के. आर. श्रीनिवास अय्यंगार यांची निवड करण्यात आली. फेब्रुवारी १९७८ मध्ये प्रा. उमाशंकर जोशी यांची निवड झाली. १९८३ मध्ये प्रोफेसर व्ही.के.गोकांक आणि १९६६ मध्ये डॉ. बी. के. भट्टाचार्य यांची निवड करण्यात आली. कन्नड भाषेतील प्रतिभासंपन्न साहित्यिक प्रा. यु. आर. अंनतमुर्ती यांची १९९३ मध्ये साहित्य अकादमीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. १९९६ मध्ये श्री. रमाकांत रथ (Rath) यांची निवड झाली. २००३ ते २००७ या कालावधीत प्रां. गोपीचंद नारंग यांची निवड झाली. २००८ ते २०१२ या कालवधीत श्री सुनील गांगोपाध्य यांची निवड झाली. भारतातील विविध क्षेत्रातील विद्वान, विचारवंत, नामवंत मंडळींची निवड साहित्य अकादमीच्या अध्यक्षपदी झाल्याचे दिसुन येते. भारतीय साहित्यविश्वाला स्वसामर्थ्याची जाणीव प्राप्त करुन देण्याचे कार्य या कार्यकारी मंडळाने दिल्याचे दिसून येते.

साहित्य अकादमीची स्थापना १९५४ साली झाली. भारतीय भाषेतील साहित्याला वाड्मयीन गुणवत्ता व विचाराची जाणीव करुन देण्याचे कार्य साहित्य अकादमीने केले आहे. यामध्ये पं. जवाहरलाल नेहरु ते सुनील गंगोपाध्य यांचे कार्य महत्वाचे आहे.

"The first president of the Sahitya Akadami was Sri Jawaharlal Nehru. He was re-elected in १९६३. After his demise in May १९६४ the General Council elected Dr. S.Radha Krishna as the President of the Sahitya Akadami.....२००८-२०१२ With Sri Sunil Granggoprthyay as President of the Sahitya Akadami."

एखादी संस्था किंवा अकादमी चालवायची असेल किंवा तिच्या द्वारे सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक मुल्यांची जोपासना करायची असेल तर त्या संस्थेची ध्येय धोरणे ज्याप्रमाणे महत्वाची ठरतात त्याप्रमाणेच त्या संस्थेच्या कार्यकारणीत काम करणारे सदस्यही तेवढेच जाणकार आणि महत्वाचे असावे लागतात. त्यामुळेच दर्जेदार आणि उत्तम व सर्वोत्कृष्ट साहित्यकृती निर्माण होऊ शकतात. या साहित्यकृतीच समाजाला दिशा देण्याचे, समाजात विचार प्रसारित करण्याचे महत्वाचे कार्य पार पाडीत असतात. या साहित्यकृती समाजाच्या विकासात आणि विस्तारात कसे मुल्यात्मक कार्य करतात याविषयी आपले मत मांडताना दिगंबर पाध्ये म्हणतात की,"चांगल्या साहित्याची स्वाभाविक भूक असते, चांगल्या साहित्यकृतीविषयी समाजात किमान एकमत असणे काही साहित्यिक समाजातील सर्व स्तरांत आदराचा विषय असणे ही निकोप साहित्याकृतीची लक्षणे मानली तर, आज सर्वत्र साधनांचा इतका विस्तार होऊनही त्या दिशेने जाणवण्यासारखी प्रक्रिया दिसत नाही. उलट जीवनाची इतर क्षेत्रेच साहित्यक्षेत्रावर वर्चस्व गाजवीत असतात, असेच बहुदा आज प्रत्ययाला येते." दिगंबर पाध्ये यांनी एकूण विश्वातील साहित्याचे आणि साहित्यिकांच्या अभिव्यक्तीच्या मुल्यांवर विवेचन केल्याचे दिसून येते, कारण उच्चत्म आविष्काराची अभिव्यक्ती साहित्यातून होणे महत्वाचे असते. त्या जाणीवा साहित्यातून व्यक्त होताना दिसतात पण दुर्देवाने अशी सकस साहित्यकृती ही वाचकभिमुख आणि रसिकाभिमुख होतेच असे नाही, पण अभिजात साहित्याकृतीची अभिरूची वाचकांना किंवा समाजमनाला असणे महत्वाचे आहे. अशा साहित्यकृतींना भावनिक मोह लावता येत नाही, त्यामुळे एकूण समाजजीवनाची वास्तवता साहित्यातून व्यक्त होते. त्यामुळे निकोप समाज निर्माण होण्यासाठी निकोप साहित्यकृतीची निर्मीती होणे महत्वाचे आहे. कालपरत्वे अशी निर्मीती झाल्याचे दिसून येते. पण आजच्या विज्ञानवादी युगामध्ये सर्वसामान्य माणसाची, समाजाची मानसीकता बदलत आहे. त्यामूळे एकुण साहित्यविश्वात न्यूनगंडात्मक मनोभूमिका निर्माण झाल्याचे दिसून येते. मला अत्यंत विनम्रपणे खंत व्यक्त करावीसी वाटते. साहित्य हे मानवी समाजजीवाचा आरसा आहे त्यामुळे

साहित्यातून मानवी समाजाचे प्रतिबिंब उभारणे अपेक्षित आहे. परंतु आजचे साहित्य साहित्याची मूळ नस पकडताना दिसत नाही, तर साहित्य अकादमी मात्र अशा साहित्याची मूळ मूल्यात्मकता जोपासात वाङ्मयवृद्धी करते, म्हणूनच तिने निवडलेल्या साहित्यकृती वेगळ्या आणि मूल्यात्मक स्वरूपाच्या ठरतात.

दिगंबर पाध्ये म्हणतात की, "कोणताही समाज 'समाज' म्हणून एकत्र नांदतो तेव्हा सर्व माणसे एकसारखी असतात किंवा सामजिक जीवनातील सर्व स्तरावर निर्भेळ सहकार्य असावे असे नाही. समाजजीवनात हितसंबधाचे संघर्ष अटळ असतात आणि ते करावेच लागतात (अगदी जागतीक पातळीवरही त्याचा अनुभव येऊ शकतो) परंतु अशा संघर्षाबरोबरच सर्वांना जोडणारे अनेक पुल समाजात अस्तित्वात असतात. कला, क्रीडा ही अशी क्षेत्रे आहेत. हे पुल जेवढे भक्कम असतील तेवढा त्या स्तरावर तो समाज एकसंध असतो." वरील मतांचा विचार करताना, दिगंबर पाध्ये यांनी मांडलेली भूमिका महत्वाची वाटते, कारण कोणताही समाज असो जेव्हा समाज म्हणून वावरतो तेव्हा त्या समाजातील माणसे एकसारखी, एकविचारी असतात का? आपापले हितसंबध जपण्यासाठी त्यांच्यामध्ये वादविवाद होत असतात. संघर्ष होत असतो मग तो संघर्ष वैचारिक, सामाजिक, संस्कृतीक एवढेच नव्हे तर कौटुंबिक पातळीवर देखील असतोच असतो. त्यामूळे समन्वय साधण्याला जे कार्य घडत असते त्यामध्ये कला, क्रीडा ही महत्वाची आहे. ज्या समाजव्यवस्थेमध्ये कला व क्रीडाचा पुल भक्कम स्वरुपाचा असतो तोच समाज एकसंघ असतो. तीच वैचारिक भूमिका ही अत्यंत महत्वाची आहे. म्हणुन भारतीय समाजव्यवस्थेला, साहित्याला आणि सांस्कृतीक मुल्यांना एकसंघ बांधण्याचे कार्य साहित्य अकादमीने केल्याचे दिसून येते. साहित्य अकादमी ही केवळ संस्था नाही तर भारतीय समाजाला राष्ट्रीय एकात्मतेची आणि सांस्कृतीक समन्वयाची जाणीव करुन देणारी एक साहित्यिक व्यासपीठ असल्याचे दिसुन येते.

जागतिक पातळीवर 'नोबेल' पुरस्काराला अनन्यसाधारण महत्व आहे. तसेच भारतामध्ये 'भारतरत्न' व 'ज्ञानपीठ' पुरस्काराला महत्व आहे. त्याचप्रमाणे भारतीय साहित्यामध्ये 'साहित्य अकादमी ' पुरस्काराला अत्यंत महत्व आहे, हे आपल्याला नाकरता येत नाही. भारतीय भाषांचे आणि साहित्याचे संवर्धन करण्याचे कार्य साहित्य अकादमीतुन केले जात आहे.

### सचिव :

साहित्य अकादमीचे 'सचिव' हे पद जबाबदारीचे आणि महत्वाचे असल्याचे दिसुन येते, कारण साहित्य अकादमीच्या स्थापनेपासुन ते आजपर्यंत (२०१२) अनेक प्रतिभावंत मंडळींची सचिवपदी निवड झाल्याचे दिसुन येते. मंगेश वैशंपायन म्हणतात की, "साहित्य-कला-संगीत नाटक अकादमीचे अध्यक्षपद नामधारी असते असे म्हटलं जातं, कारण अध्यक्ष असले तरी वर्षाला किमान २० कोटी रुपये अनुदान मिळणाऱ्या या अकादमीचा प्रचंड दैनदिन कारभार संभाळण्याची जबाबदारी सचिवपदावर असते." मंगेश वैशंपायन यांनी साहित्य अकादमी सारख्या एका नावाजलेल्या आणि पुरस्कृत अकादमीमध्ये सचिव पदाला किती मोठे महत्व असते हे अतिशय नेमक्या शब्दात वर्णन केले आहे.

साहित्य अकादमीमध्ये सचिवपद एक प्रतिष्ठेचे आणि जबाबदारीचे आहे. भारत सरकारकडुन प्रतिवर्षी २० कोटींचा निधी भारतीय साहित्य चळवळीला अनुदान म्हणुन प्राप्त होतो. या निधीचा उपयोग भारतीय साहित्याला व साहित्यिकांना आर्थिक सुबत्ता प्राप्त करुन देणारा वाटतो. या निधाचा उपयोग साहित्य समृद्धीसाठी केला जातो, म्हणुन साहित्य अकादमीचा एक कर्ता-करविता म्हणून सचिवपद हे साहित्य अकादमीमध्ये महत्वाचे आहे.

सचिव हे भारतीय साहित्याच्या उन्नतीसाठी मिळणा-या साहित्याच्या विविध घटकांवर खर्च करित असतो. साहित्य अकादमीचे सचिव हे पद निष्कलंक, नि:स्वार्थी साहित्याचे अभिरुची असणारे आणि भारतीय भाषेतील साहित्याला वैश्विक दर्जा प्राप्त करुन देण्याचे आत्मीक अभिलाषा सचिवाच्या ठायी असणे मला महत्वाचे वाटते. म्हणुन साहित्य अकादमीच्या कार्यकरी मंडळामध्ये सचिव हे पद महत्वाचे आहे. सचिव हा सर्वभाषीक साहित्याला समन्वयवादी दृष्टीने न्याय देणारा असणे महत्वाचे असते. म्हणून साहित्य अकादमीच्या स्थापनेपासुन ते आजपर्यंतच्या सचिवांनी भारतीय साहित्याला न्याय देण्याचे कार्य केलेले आहे.

### ४. साहित्य अकादमी आणि भारतीय भाषा :

मानवी जीवनात भाषेला अत्यंत महत्व आहे, भाषा, समाज, साहित्य आणि संस्कृती यामध्ये ऋणानुबंध आहे. भाषा, साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य भारतीय पातळीवर साहित्य अकादमीने केल्याचे दिसुन येते.

"Besides the twenty two languages ebuvnerated in the Constitution of India, the sacristy Academy has rehired English and Rajasthan as languagesङ in which its programme and be implemented Names of an embers of anxious language Advisory Boards, with have been constituted advice for implementing literary programmes in these २४ languages are given in Appendix -V " वरील मतांच्या आधारे भारतीय भाषा आणि साहित्य अकादमी यांनी केलेले वाङ्मयीन कार्य महत्वाचे वाटते. कारण भारतीय भाषेतील साहित्याची आत्मिक जाणीव भारतीय वाचकांना, रसिकाना होण्यासाठी भारतीय राज्यघटनेने मान्य केलेल्या २२ भाषांबरोबरच इंग्रजी आणि राज्यस्थानी या दोन भाषेतील साहित्याचे म्हणजेच या भारतीय भाषेतील साहित्यांचे सामजिक, सांस्कृतीक, ऐतिहासिक देवाण-घेवाणीसाठी व मूल्यात्मक आणि गुणात्मक शोध घेण्यासाठी साहित्य अकादमीने २४ भाषांना घटनात्मक मान्यता दिल्याचे दिसुन येते त्या भाषा पुढील प्रमाणे:-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) आसामी | २) बगांली३) बोडो | ४) मैथाली | ५) मणीपुरी | ६) नेपाळी | |
| ७) ओरीया | ८) गुजराती | ९) कोकणी | १०) मराठी | ११) सिंधी | १२) डोगरी |
| १३) इंग्रजी | १४) हिन्दी | १५) काश्मीरी | १६) पंजाबी | १७) राज्यस्थानी | १८) संस्कृत |
| १९) संतोली (Santhali) | २०) उर्दू | २१) कन्नड | २२) मल्ल्याळम | २३) तामिली | |

२४) तेलुगू इत्यादी भारतीय भाषांचा अंर्तभाव साहित्य अकादमीमध्ये केल्याचे दिसुन येते.

साहित्य अकादमीने ३१ डिसेंबर १९९१ मध्ये 'समकालीन भारतीय साहित्य' हे त्रैमासिक सुरु केले. कालांतराने त्याचे द्वैमासिकात रुपातंर झाले.भारतीय भाषेतील साहित्याच्या जडणघडणीमध्ये समकालीन भारतीय साहित्याचे योगदान किती महत्वाचे आहे त्याविषयी गिरधर राठी म्हणतात की, "सब से बडी संतोष इसी बात का है की समस्त भाषाओं उपभाषाओं और जन-भाषाओं के रचनाकारोंने समकालीन भारतीय साहित्यिको मुक्तभाव से सहयोग दिया है। निहायत नार और अज्ञान लेकिन संभावनाशील समर्थ रचनाकारोंसे लेकर, विश्वविख्यात और वयोवद्ध रचनाकारोंकी नामावली पर अगर ध्यान दे तो हम पाएंगे की समकालीन भारतीय साहित्यने एक बहुन बड़े साहित्यिक समुदायको अपने भीतर समेटा है। दलों, गुरों और विशेष व्यक्तीयोंके दबावों से मुक्त समकालीन भारतीय साहित्यके लेखकीत परिवारने सिर्फ उन रचनाओं से रचनाकारोसे नहीं-परहेज बरता है जो बुनियादी मानव मुल्यों देश के मुलभुत संवैधानिक नकाजों और वर्तमान एवं भाविष्य की स्वस्थ आशा-आकाक्षाओं से किसी भी कारण से विमुख्य थे।"

वरील मतातून गिरधर राठी यांनी भारतीय साहित्याच्या अभिवृद्धीमध्ये आणि संवर्धनामध्ये साहित्य अकादमीच्या समकालीन भारतीय साहित्याचे वाङ्मयीन योगदान किती महत्वाचे आहे, भारतीय भाषा आणि भाषेतील साहित्याला वाङ्मयीन दर्जा प्राप्त करुन देण्याचे कार्य या त्रैमासिकाने कसे केलेले आहे, सर्वसामान्य साहित्यिका पासून ते विश्वविख्यात साहित्यिक, विचारवंत, समीक्षक अशा अनेकविध साहित्यिक मंडळींचा संघटन असो समुदाय (समुह) निर्माण झालेला आहे. भारतातील कोणताही राजकीय पक्ष असो किंवा राजकर्ता यापासुन साहित्य अकादमी दूर असल्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या तत्वमुल्यांशी बांधील राहुन मानवी मुल्ये, सामाजिक, सांस्कृतिक मुल्यांचे विवेचन साहित्यिकांनी साहित्यकृतीतून अभिव्यक्त केल्याचे दिसुन येते. साहित्य अकादमीने केलेले वाङ्मयीन कार्य त्रिकालाबाधीत स्वरुपाचे आहे. हे नाकारता येत नाही.

वर्तमानपत्रात मात्र साहित्य अकादमीच्या पुरस्काराविषयी वेगवेगळी विधाने ऐकावयास येतात. त्यामुळे साहित्य अकादमीच्या पुरस्काराविषयीही साशंकता निर्माण होऊ लागली आहे. म्हणजे अकादमीद्वारे देण्यात येणाऱ्या पुरस्काराविषयीही चिंतन केले जात आहे कारण अकादमीने अलीकडच्या काळात घोषीत केलेले काही पुरस्कार आणि त्या साहित्यकृती पाहून काही प्रश्न उपस्थित होणे अपरिहार्य वाटते.

## सारांशः

भारतीय साहित्य अकादमी ही भारतातील एक मोठी व नावाजलेली साहित्य संस्था आहे. भारतीय स्वातंत्र्यापासून ते आजतागायत साहित्य अकादमीने भारतीय साहित्याच्या क्षेत्रात अतुलनीय कार्य केले आहे. साहित्य अकादमीने भारतीय साहित्याला एक नवी दिशा, एक नवी परिभाषा निर्माण करुन दिली आहे. तसेच सामाजिक, सांस्कृतिक, अनुबंध, साहित्य अकादमीद्वारे अधिक दृढ होत गेल्याचे दिसून येते.

## निष्कर्ष

प्रकरणात साहित्य अकादमीच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या कार्याचा आढावा घेतला आहे. साहित्य अकादमी ही भारतीय साहित्याच्या क्षेत्रात अत्यंत नावाजलेली आणि प्रतिष्ठित पावलेली साहित्य संस्था म्हणून ओळखली जाते. अकादमीच्या कार्यकारणीत भारताच्या विविध क्षेत्रातील नामांकित तसेच वेगवेगळया विषयात पारंगत असणारे मान्यवर कार्य करीत असल्याचे दिसून येते. भारतीय साहित्याच्या जागतिक साहित्याचा दर्जा मिळवून देण्यात साहित्य अकादमीचा महत्वाचा वाटा आहे. भारतीय समाजात बोलल्या जाणाज्या विविध भाषांपैकी २४ भारतीय भाषांना साहित्य अकादमीने मान्यता दिलेली आहे. या मान्यताप्राप्त भाषांत लिहिल्या गेलेल्या वेगवेगळया वैशिष्ट्यपूर्ण आणि गुणवत्तापूर्ण साहित्यकृतींना हा पुरस्कार मिळालेला आहे.

साहित्याच्या अभिवृध्दीस अकादमी नेहमी तत्पर असल्याचे तिच्या कार्यविस्ताराहून प्रत्ययास येते. साहित्य अकादमी स्वतंत्र साहित्य निर्मितीस प्रोत्साहन तर देतेच. शिवाय साहित्याच्या क्षेत्रात इतर भाषांतील साहित्याही मोठया प्रमाणात यावे, म्हणूनही अकादमीच्या वतीने प्रयत्न होत असल्याचे दिसून येते. अकादमीद्वारे सर्वोकृष्ट अनुवादासही पुरस्कार दिला जातो. त्याचबरोबर बालसाहित्याचा विकास व्हावा, नवोदित साहित्यिकांत लेखन प्रेरणा निर्माण मिळाव्यात. यासाठी अकादमीद्वारे देण्यात येणारी बालसाहित्य पुरस्कार युवासाहित्य पुरस्कार अत्यंत महत्वाचे ठरलेले आहेत.

- भारतीय साहित्याला जागतिक साहित्याचा दर्जा मिळवून देणारी एक महत्वाची साहित्य संस्था म्हणजे साहित्य अकादमी.
- सामाजिक, सांस्कृतिक अनुबंधाची जोपासना वाढीस नेणारी एक महत्वपूर्ण साहित्य संस्था साहित्य अकादमी होय.

- गुणात्मक आणि मुल्यात्मक साहित्य निर्मितीस प्रेरणा देणारी एक साहित्यिक संस्था म्हणजे साहित्य अकादमी.
- निःपक्षपातीपणे सर्वाकृष्ट वाङ्मयकृतीची निवड करणारी वर्तमान काळातील महत्वपूर्ण साहित्य संस्था.
- अपवादात्मक परिस्थितीत त्या त्या वर्षी कलाकृती निवडण्यात प्रश्न उपस्थित निर्माण झाले तरी शेवटी अंतिम एकच कलाकृती निवडण्याचे बंधन असल्यामुळे श्रेष्ठ, कनिष्ठ ठरवावेच लागते.
- काळाच्या ओघात काही महत्वाच्या कालाकृतींना पुरस्कार लागले नाहीत. यामागील कारणांचाही विचार निर्माण होतो.
- निवड करताना व्यक्तिविशिष्टता येणार हे मान्य करावेच लागते, त्यामुळे दोष साहित्य अकादमी संस्थेला किंवा तज्ञ निवड समितीला देता येणार नाही.
- बाजारु पुरस्कार संस्कृतीची एक लाटच सध्या वर्तमान स्थितीत निर्माण झालेली आहे. या लाटेपासून अलिप्त राहून आपले वेगळेपण आणि वर्चस्व अकादमी टिकवून ठेवले हे निश्चित.

## संदर्भ

१) डॉ.रेखा देशपांडे, अंतरभारती साहित्य संवाद, चर्चासत्र, मुंबई, (भारतीय भाषाओमें अनुवाद), ६,७ जानेवारी २००७.
२) डॉ.दयानंद भोवाळ, गिरीष कर्नाड यांच्या भाषांतरीत मराठी नाटकांचा, चिकित्सक अभ्यास (अप्रकाशित प्रबंध) पृ.४७.
३) Sahitya Akadami,Sahitya Akadami(Genreral Information), President - Shri.Sunil Gangopadhayay, Sahitya Akadami Prakashan, New Delhi, Peg. ०२, ०३.
४) दिगंबर पाध्ये, साहित्य : समाज आणि संस्कृती लोकवाङ्मयगृह, प्रकाशन, मुंबई आवृत्ती तिसरी,२००५ पृ.४९.
५) दिगंबर पाध्ये, साहित्य : समाज आणि संस्कृती लोकवाङ्मयगृह, प्रकाशन, मुंबई आवृत्ती तिसरी, २००५ पृ.५०.
६) मंगेश वैशंपायन, सप्तरंग 'सकाळ', रविवार दि.२३ सप्टेंबर २०१२, पृ.०७.
७) Sahitya Akadami, उ.नि.पृ.०३.
८) गिरिधर राठी, समकालीन भारतीय साहित्य द्विमासिक, संपा. गिरिधर राठी, वर्ष - २४ अंक ११३ मई, जून -२००४. साहित्य अकादमी प्रकाशन, नई दिल्ली, पृ.०७.
९) राम जगताप, बाजारु पुरस्कार संस्कृती, लोकरंग, दैनिक लोकसत्ता, रविवार दि.०८ डिसेंबर २०१३ पृ.१, ७.
१०) राम जगताप,बाजारु पुरस्कार संस्कृती, लोकरंग, दैनिक लोकसत्ता, रविवार दि.०८ डिसेंबर २०१३ पृ.७.

LBP PUBLICATION